# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **"स्वच्छता अंगिकारुया, आजारपण पळवूया" या अभियान अंतर्गत मा. आयुक्त यांच्या शुभहस्ते लोगोचे अनावरण**
- **१ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत "स्वच्छता अंगिकारुया, आजारपण पळवूया" या नवीन अभियानाची मिरा भाईंदर महानगरपालिका करणार प्रभावी अंमलबजावणी**

स्वच्छतेचा आणि आरोग्याचा परस्पर संबंध लक्षात घेऊन स्वच्छ केंद्र शासनाच्या भारत मिशनच्या वतीने 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत "स्वच्छता अंगिकारुया, आजारपण पळवूया" ही संकल्पना नजरेसमोर ठेवून 'सफाई अपनाओ बिमारी भगाओं' हे अभियान १ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत जाहीर करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०२ जुलै २०२४ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते महापालिकेने या अभियानासाठी तयार केलेल्या लोगोचे अनावरण करण्यात आले. सदर प्रसंगी अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त सचिन बांगर, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबित, सहाय्यक संचालक नगररचना पुरुषोत्तम शिंदे व अधिकारी उपस्थित होते.

"स्वच्छता अंगिकारुया, आजारपण पळवूया" या अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने वेगवेगळे उपक्रम राबविण्यास महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली या आधीपासूनच सुरुवात केली आहे. या स्पर्धेत मार्केट्सची स्वच्छता, शाळा व महाविद्यालयांतील स्वच्छता, बसस्टँड, हॉटेल्स, पेट्रोल पंप, वाणिज्य संकुले व आस्थापना अशा प्रकारची सार्वजनिक वर्दळीच्या ठिकाणांवरील स्वच्छता, सार्वजनिक उद्यानांची स्वच्छता करण्यात येणार आहे. याबाबत अंमलबजावणी करताना घनकचरा व्यवस्थापन व आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग यांच्यासोबत सर्वच विभागांनी सक्रीय सहभाग नोंदवून हे अभियान यशस्वी करण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या. या अभियानांतर्गत विशेष स्वच्छता मोहीमांचे आयोजन, कचरा संकलन आणि वाहतुकीचे नियोजन, सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची नियमित स्वच्छता, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छताविषयक जागरूकता व त्यांच्या प्रत्यक्ष सहभागावर भर, शुध्द जलाच्या नियमित चाचण्या, स्वच्छ व शुध्द पाण्याचा पुरवठा आणि पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल, आरोग्याच्या दृष्टीने संवेदनशील क्षेत्रामध्ये विशेष लक्ष आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना, स्वच्छता व पावसाळी कालावधीत घ्यावयाच्या आरोग्य विषयक दक्षतेबाबत जनजागृती व माहिती प्रसार, पीपीटी अर्थात आरोग्य विषयक संरक्षण प्रतिबंध व उपचार अंमलबजावणी अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शहरवासियांचा देखील सहभाग यामध्ये महत्त्वाचा राहणार असून शहरातील सर्व नागरिकांनी या विविध मोहिमेत सहभाग घेऊन पुन्हा एकदा मिरा भाईंदर शहराला नंबर वन बनवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

02/07/24